# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/09/2023 (शुक्रवार) सकाळ

---

### घरफोडी

**पो.स्टे. खापा :–** अंतर्गत २५ कि.मी अंतरावरील मौजा बिछवा येथे दिनांक २८/०८/२०२३ चे ११/३० वा. ते १७/३० वा. दरम्यान यातील संशयीत आरोपी नामे– १) मुरलीधर ढोले, २) वसंता गजभिये दोन्ही रा. बिछवा यांनी फिर्यादी नामे– निकंठ राघोजी ठाकरे, वय ५८ वर्ष रा. बिछवा यांच्या घराची विटा मातीची भिंत तोडुन आत प्रवेश करून हॉल मधला दरवाजा तोडुन आलमारीतील ठेवलेल्या पर्स मधुन नगदी १०,०००/– रूपये संशयीत आरोपींनी चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार प्रमोद बन्सोड ९९२३४१०२२३ हे करीत आहे.

### फसवणुक

**पो.स्टे. रामटेक :–** अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील कॅनेरा बॅक शाखा मनसर येथे दिनांक ०५/०१/२०२३ ते दि. १०/०७/२०२३ चे १४/०० वा. ते १५/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विपुल रमेश ढोके, वय २२ वर्ष रा. भिलेवाडा ता. रामटेक याला अनोळखी मोबाईलवरुन फोन आला व मी Edubridge Pvt Ltd येथून सैकाट बोलत आहे. त्यांनी फिर्यादीला कोणते कोर्स करायचा आहे. असे विचारल्याने फिर्यादीने Software testing चा कोर्स करायचा आहे असे सांगितल्याने त्यांनी आमच्याकडे चार महीन्याचा कोर्स आहे. कोर्स करताच शंभर टक्के नौकरीची हमी आहे. या उद्देशाने फिर्यादीने होकार दिल्याने तुम्हाला एक गॅरेंटर लागेल व तुम्हाला त्याच्या पुर्ण अंकाउंटची माहीती दयावी लागेल व आमच्याकडे सर्व सेफ राहते. असे बोलल्याने फिर्यादीने आपल्या वहीनीचा कॅनेरा बॅक खाता ज्याचा अकाउंट नंबर दिला व गॅरेटरला कॉल येणार तर त्यांनी OTP सांगायची असे बोलल्याने फिर्यादीच्या वहीनीने त्यांना फोनवर हो म्हटले काही दिवसांनी फिर्यादीच्या वहीनीच्या अंकाउट मधुन ५९४०/– रु. कटल्याने फिर्यादीला सांगितल्याने बॅकेकडून ट्रांजॅक्शन डिटेल मिळाल्यानंतर माहीत झाले की, फिर्यादीने Software testing चा कोर्स केला होता. तेव्हा फिर्यादीने वहीनीचे बॅकेचे डिटेल्स, डाकुमेंटस पॅन कार्ड, आधार कार्ड दिले होते. त्यावरुन फिर्यादी व फिर्यादीचे वहीनीला एजुकेशन लोन बाबत कोणत्याही प्रकारे माहीती न देता विश्वासात घेवून वैयक्तीक कागदपत्राचे गैरवापर करुन फिर्यादी व फिर्यादीच्या वहीणीच्या कागदपत्राचे आधारे किंमती ९११००/– रु. चा Edubridge Pvt Ltd ने लोन उचलुन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी अमित पांडे मो. नं. ९८८१६८३१८४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**